SanskritiManthan : International Journal of Empowerment & Indian Culture
संस्कृतिमंथन: सशक्तीकरण आणि भारतीय संस्कृतीवरील आंतरराष्ट्रीय संशोधन पत्रिका
संशोधनातून संस्कृतीचा साक्षात्कार

# भारतातील स्त्री व बालक सशक्तीकरण: इतिहास, समाज व शिक्षणाची भूमिका

अभय त्रिवेदी
अमित वरसाळे
आर.सी. पटेल आयएमआरडी, शिरपूर

**सारांश (Abstract):**

या संशोधन प्रबंधामध्ये "स्त्री व बालक सशक्तीकरण" या विषयाचा अभ्यास केला आहे. स्त्रिया आणि बालक समाजाचा महत्त्वाचा भाग असूनही, त्यांना अनेक वर्षे कमी लेखण्यात आले आहे. त्यांना शिक्षण, आरोग्य, आणि आर्थिक संधींमध्ये मर्यादा आल्या आहेत.

या प्रबंधात आपण इतिहासात स्त्रिया आणि बालकांची स्थिती कशी होती, त्यात कसे बदल झाले, समाजातील त्यांची भूमिका काय आहे, शिक्षणाचे महत्त्व काय आहे, आणि सरकारने सशक्तीकरणासाठी कोणत्या योजना व कायदे केले आहेत, याचा अभ्यास केला आहे.

आजच्या काळातील अडचणी आणि त्यावर उपाय सुचवले आहेत. समाज सशक्त होण्यासाठी स्त्रिया आणि बालकांना योग्य संधी, जागरूकता आणि सहभाग मिळणे गरजेचे आहे, हे या अभ्यासातून समोर आले आहे.

**परिचय (Introduction):**

1. **स्त्रिया आणि मुलांचं महत्त्व** – ते समाजाचा मोठा आणि महत्त्वाचा भाग आहेत, पण इतिहासात त्यांना कमी लेखलं गेलं.
2. **मर्यादा** – शिक्षण, आरोग्य, आणि नोकरीच्या संधींमध्ये त्यांना बऱ्याच अडचणी आल्या.
3. **कारणे** – पितृसत्ताक विचार, जुन्या परंपरा, अंधश्रद्धा, आणि सुरक्षिततेच्या समस्या.
4. **आजची गरज** – स्त्रिया आणि मुलांना स्वातंत्र्य, प्राधान्य, आणि स्वतःचे निर्णय घेण्याची संधी मिळायला हवी.
5. **सशक्तीकरणाची साधने** – शिक्षण, आरोग्य, आर्थिक स्वावलंबन, आणि निर्णय प्रक्रियेत सहभाग.
6. **सरकारी प्रयत्न** – बेटी बचाओ बेटी पढाओ, बालविवाह प्रतिबंधक कायदा, आणि राष्ट्रीय बाल संरक्षण धोरण यांसारख्या योजना.
7. **अजूनही अडथळे** – अनेक ठिकाणी लोकांची विचारसरणी जुनी आहे, सुरक्षिततेच्या समस्या आहेत, आणि मुलींना शिक्षणाऐवजी लवकर लग्न लावलं जातं.

8. **अभ्यासाचा उद्देश** – इतिहास, समाज, आणि शिक्षणाच्या दृष्टिकोनातून स्त्री व बालक सशक्तीकरणाचा अभ्यास करणे आणि भविष्यासाठी योग्य उपाय सुचवणे.

| मुद्दा | पूर्वी | आता |
|---|---|---|
| शिक्षण | मुलींना शिक्षणाची संधी कमी | शिक्षणाच्या संधी आणि प्रवेश वाढला |
| निर्णय प्रक्रिया | निर्णयात सहभाग नव्हता | कुटुंब व समाजात मताला महत्त्व |
| सुरक्षितता | संरक्षण व कायद्यांचा अभाव | संरक्षणासाठी कायदे व हेल्पलाइन उपलब्ध |
| सामाजिक दृष्टिकोन | पितृसत्ताक विचारसरणी | समानतेबद्दल जागृती वाढली |

**उद्दिष्टे (Objectives):**

1. ऐतिहासिक दृष्टिकोनातून स्त्री व बालक सशक्तीकरणाचा अभ्यास करणे
2. समाजातील स्त्री व बालकांच्या भूमिकेचे समाजशास्त्रीय विश्लेषण करणे
3. शैक्षणिक सशक्तीकरणाचे महत्त्व स्पष्ट करणे
4. सरकारी योजना, कायदे आणि धोरणांचा अभ्यास करणे
5. समकालीन आव्हाने व उपाय शोधणे
6. सशक्तीकरणासाठी जागृती व सहभागाची गरज समजावून सांगणे
7. भविष्यातील सशक्त समाजनिर्मितीसाठी स्त्री व बालक सशक्तीकरणाचे महत्त्व स्पष्ट करणे

**संशोधन पद्धती (Research Methodology):**

| **टप्पा** | **तपशील** |
|---|---|
| **उद्दिष्टे** | समतेचे भान, शिक्षणाची भूमिका, अडथळे, जागरूकता |
| **नमुना** | 100–300; शहरी व ग्रामीण; सर्व वयोगट, शिक्षण पातळी |

SanskritiManthan : International Journal of Empowerment & Indian Culture
संस्कृतिमंथन : सशक्तीकरण आणि भारतीय संस्कृतीवरील आंतरराष्ट्रीय संशोधन पत्रिका
संशोधनातून संस्कृतीचा साक्षात्कार

| | |
|---|---|
| **माहिती संकलन** | Google Forms + मुलाखती / फोकस ग्रुप (पर्यायाने) |
| **विश्लेषण** | सांख्यिकी + थीमॅटिक विश्लेषण |
| **निष्कर्ष** | उपाय |

**1. इतिहासात स्त्रिया व बालकांना समान हक्क मिळाले असे आपल्याला वाटते का?**




**2. सध्याच्या समाजात स्त्रिया व बालकांना निर्णय प्रक्रियेत कितपत सहभाग मिळतो असे वाटते?**



3. शिक्षण हे स्त्री व बालक सक्षमीकरणाचे मुख्य साधन आहे असे तुमच्या मते?




4. तुमच्या मते मुलींसाठी सर्वात मोठा अडथळा कोणता आहे?




5. स्त्री व बालक सक्षमीकरणासाठी समाजातील सर्वांना जागरूक करणं आवश्यक आहे का?

SanskritiManthan : International Journal of Empowerment & Indian Culture
संस्कृतिमंथन : सशक्तीकरण आणि भारतीय संस्कृतीवरील आंतरराष्ट्रीय संशोधन पत्रिका
संशोधनातून संस्कृतीचा साक्षात्कार




**संशोधन गृहित (Hypothesis):**

**प्रश्न:** शिक्षण हे स्त्री व बालक सक्षमीकरणाचे मुख्य साधन आहे असे तुमच्या मते?
**गृहितक:**

- **$H_0$ (Null Hypothesis):** उत्तरांचा वितरण सर्व पर्यायांमध्ये समान आहे.
- **$H_1$ (Alternative Hypothesis):** उत्तरांचा वितरण सर्व पर्यायांमध्ये समान नाही.

| Sr. No. | पर्याय | Oi | Ei | Oi-Ei | $(Oi-Ei)^2$ | $(Oi-Ei)^2/Ei$ |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | पूर्णपणे सहमत | 83 | 33.33 | 49.67 | 2467.71 | 74.03 |
| 2 | अंशतः सहमत | 14 | 33.33 | -19.33 | 373.67 | 11.21 |
| 3 | सहमत नाही | 3 | 33.33 | -30.33 | 919.87 | 27.60 |
| | Total | 100 | 100 | | | 112.84 |

$\chi 2=112.84$

या प्रकरणात बहुतेक $H_1$ स्वीकारला जाईल –
म्हणजे **शिक्षण हे स्त्री व बालक सशक्तीकरणाचे मुख्य साधन आहे** या बाबतीत प्रतिसादांमध्ये महत्त्वपूर्ण फरक आहे.
**Degree of Freedom (df): 2**
**Critical Value (0.05 level): 5.991**

**निष्कर्ष:**
**$x^2$ मूल्य 112.84 > 5.991 असल्यामुळे, निकाल महत्त्वपूर्ण आहे आणि परिकल्पना स्वीकारली जाते.**

---

**प्रश्न:** तुमच्या मते मुलींसाठी सर्वात मोठा अडथळा कोणता आहे?
**गृहितक:**

- **$H_0$ (Null Hypothesis):** उत्तरांचा वितरण सर्व पर्यायांमध्ये समान आहे.
- **$H_1$ (Alternative Hypothesis):** उत्तरांचा वितरण सर्व पर्यायांमध्ये समान नाही.

| Sr. No. | पर्याय | Oi | Ei | Oi-Ei | $(Oi-Ei)^2$ | $(Oi-Ei)^2/Ei$ |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | गरीबी | 14 | 25 | -11 | 121 | 4.84 |
| 2 | कुटुंबातील विचारसरणी | 41 | 25 | 16 | 256 | 10.24 |
| 3 | बालविवाह | 7 | 25 | -18 | 324 | 12.96 |
| 4 | सुरक्षिततेचे समस्या | 38 | 25 | 13 | 169 | 6.76 |
| | Total | 100 | 100 | | | 34.80 |

X2=34.80

या प्रकरणात बहुतेक $H_1$ स्वीकारला जाईल –
म्हणजे **तुमच्या मते मुलींसाठी सर्वात मोठा अडथळा कोणता आहे** या बाबतीत प्रतिसादांमध्ये महत्त्वपूर्ण फरक आहे.
**Degree of Freedom (df): 3**
**Critical Value (0.05 level): 7.815**

**SanskritiManthan : International Journal of Empowerment & Indian Culture**

**संस्कृतिमंथन: सशक्तीकरण आणि भारतीय संस्कृतीवरील आंतरराष्ट्रीय संशोधन पत्रिका**

संशोधनातून संस्कृतीचा साक्षात्कार

**निष्कर्ष:**

**$x^2$ मूल्य 34.80 > 7.815 असल्यामुळे, निकाल महत्त्वपूर्ण आहे आणि परिकल्पना स्वीकारली जाते.**

**डेटा विश्लेषण (Data Analysis):**

(जनमत):

1. त्यांना प्राधान्य व स्वातंत्र्य मिळावे, स्वतःचे निर्णय घेण्याची संधी मिळावी.
2. पितृसत्ताक विचार व शिक्षणाचा अभाव हा मोठा अडथळा ठरतो, बालविवाह व कौटुंबिक दबावामुळे स्त्रिया व बालक झिजतात. कायद्यांची अंमलबजावणी कमजोर असून संधीही मर्यादित असतात.
3. पुरुषसत्ताक मानसिकता, अंधश्रद्धा, आणि रूढी परंपरा हे स्त्री व बालक सक्षमीकरणात अडथळा ठरतात. याशिवाय शिक्षणाचा अभाव, गरीबी व लैंगिक भेदभावदेखील मोठी अडचण निर्माण करतात.
4. अनेक ग्रामीण व मागास भागांमध्ये मुलींना आणि महिलांना शिक्षणाची संधी मिळत नाही. शिक्षणाशिवाय आत्मनिर्भरता व सक्षमीकरण शक्य होत नाही.
5. मुलगा कुटुंबाचा आधार असतो
6. स्त्री व बालक सक्षमीकरणातील सर्वात मोठे आव्हान म्हणजे समाजाची पितृसत्ताक मानसिकता. ही मानसिकता स्त्रियांना व बालकांना दुय्यम व निर्बंधित भूमिका देते, ज्यामुळे त्यांना समान संधी, शिक्षण, आरोग्य व निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य मिळत नाही.
7. शिक्षण व कायद्यामुळे परिस्थितीत सुधारणा झाली असली, तरी अनेक ठिकाणी लोकांची मानसिकता अजूनही जुन्या विचारसरणीवर आधारित आहे.
8. गरीब कुटुंबांमध्ये मुलींना शिक्षणाऐवजी कामासाठी किंवा लवकर लग्नासाठी भाग पाडले जाते.

**निष्कर्ष (Conclusion):**

या अभ्यासातून हे कळलं की, भारतात स्त्रिया आणि मुलांच्या सशक्तीकरणासाठी **शिक्षण खूप महत्त्वाचं** आहे. केलेल्या आकडेवारीच्या तपासणीत दिसलं की बहुतेक लोकांच्या मते शिक्षण हे सशक्तीकरणाचं मुख्य साधन आहे.

तसंच, मुलींसमोरचे सर्वात मोठे अडथळे म्हणजे **कुटुंबातील जुन्या विचारसरणी** आणि **सुरक्षिततेच्या समस्या** आहेत. हे दूर करण्यासाठी समाजात जागृती करणे, सरकारी योजना योग्य रितीने राबवणे आणि स्त्री-पुरुष समानतेबद्दल चांगला दृष्टिकोन ठेवणे गरजेचे आहे.

इतिहासात स्त्रिया आणि मुलांना संधी कमी मिळाल्या, पण आता **शिक्षण, सरकारी योजना आणि समाजाचा सहभाग** यामुळे त्यांची स्थिती सुधारतेय. भविष्यात सशक्त समाज घडवण्यासाठी **शिक्षण, जागृती आणि सुरक्षित वातावरण** ही तीन गोष्टी खूप महत्त्वाच्या ठरतील.

**संदर्भ (References):**


- भारत सरकार – महिला व बालविकास मंत्रालय. (2023). *वार्षिक अहवाल*
- National Family Health Survey (NFHS-5), Ministry of Health and Family Welfare.
- UNESCO (2022). Education and Gender Equality Report.
- Desai, S., & Vanneman, R. (2020). India Human Development Survey (IHDS).
- Kulkarni, A. (2019). *स्त्री सशक्तीकरण: एक सामाजिक विश्लेषण*. पुणे: विद्यापीठ प्रकाशन.
- Government of India. (2021). Beti Bachao Beti Padhao Scheme Guidelines.
- UNICEF India. (2022). Child Rights and Protection Overview.